महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय आरोग्य अभियान
**राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, महाराष्ट्र**

**कार्यकारी संचालक**
कार्यालय दुरध्वनी
क्र. ०२०-२६०५७५०१/१०
Email ID - shsrc.gom@gmail.com
**Reg. No. : Pune/ 0001639/2024**

राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र,
औंध जिल्हा रुग्णालय परिसर, सांगवी फाटयाजवळ, औंध छावणी, औंध, पुणे - ४११०२७

राआयंसंकें/ EPF कामकाज दरत्रके/ ४६८ /२०२६
दिनांक २५/०४/२०२६

प्रति,

--------------------------------

--------------------------------

विषय : सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात कर्मचारी वेतनातून कपात करण्यात आलेल्या ईपीएफ संबंधित कामकाजासाठी दरपत्रके मागविणेबाबत.

संदर्भ - मा.कार्यकारी संचालक, SHSRC यांची मंजूर ईनस्ती दि.२०/०४/२०२६

राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र पुणे या कार्यालयातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे दरमहा मानधनातून शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार भविष्य निर्वाह निधी (EPF) रक्कम कपात करण्यात येते. सदर कपात रक्कमचे प्रत्येक महिन्यास ऑनलाईन चलन जनरेट करणे, त्यातील तांत्रिक अडचणी सोडवणे, शंकाचे निरसण करणे, नवीन कर्मचारी यांची ईपीएफ प्रणालीव्दारे नाव नोंदणी करणे इत्यादी कामकाज करण्यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता एजन्सी नियुक्त करणेसाठी या पत्राव्दारे सदर कामकाजासाठी दरपत्रक मागविण्यासाठी नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

यानुसार आपण सदर काम करण्यास इच्छुक असल्यास आपले दरपत्रक भरुन या कार्यालयास ही नोटीस(सुचना) संकेतस्थळावर प्रसिध्द झालेपासून दि. ०६/०५/२०२६ पर्यंत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवावेत. याबाबत काही चौकशी करावयाची असल्यास या कार्यालयाचे दुरध्वनीवर (०२०-२६०५७५०१ / ५१०) संपर्क साधावा.

या कार्यालयास उशिराने प्राप्त होणारे आणि अपुर्ण अथवा खाडाखोड केलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही तसेच संबंधित कामकाजाबाबत अंतीम निर्णय घेण्याचे अधिकार सर्वस्वी मा. कार्यकारी संचालक यांचे रहातील याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी संचालक**
**राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र पुणे**